महाराष्ट्र शासन
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय , अवसरी खुर्द
तालुका - आंबेगाव, जिल्हा पुणे ४१२४०१

दूरध्वनी क्र. : ०२१३३-२३०५८२ संकेतस्थळ : www.gcoeara.ac.in
ईमेल: office.gcoeavasari@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.शाअसंमअ/विवि/२०२३/534 दिनांक

परीपत्रक

विषय - डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजने मधील शै.वर्ष २०२२-२३ मधील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती करीता हमीपत्र विद्यार्थी विभागात जमा करणे बाबत.

उपरोक्त विषयांस अनुसरुन या महाविद्यालयातील शै.वर्ष २०२२-२३ मधील प्रथम ते चतुर्थ वर्षातील पात्र विद्यार्थ्यानी डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजने करीता महाडिबीटी पोर्टल वर ऑनलाईन अर्ज भरले आहे. सदर अर्ज तपासणी करीता संबधित अर्जामध्ये विद्यार्थी प्रत्यक्षात किती महिने (शासकिय / खाजगी) वसतिगृहात वास्तव्यास आहे या बाबतचे लेखी **हमीपत्र** विद्यार्थी विभागात तात्काळ जमा करावे जेणकरुन संबधित विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणी करुन वरीष्ठ कार्यालयास मंजुरी करीता पाठवण्याची कार्यवाही करण्यास सोईचे होईल याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

जे विद्यार्थी **दि. १०/०२/२०२२** रोजी पुर्वी त्यांचे लेखी हमीपत्र विद्यार्थी विभागात जमा करणार नाही व त्यामुळे त्यांचे शै.वर्ष २०२२-२३ चे डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजनेचे शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित राहील्यास संबधित विद्यार्थी जबाबदार राहतील याची देखील विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. व सोबत खालील कागदपत्रे हमीपत्रासोबत जोडावे.

१.लेखी हमीपत्र.
२. शै.वर्ष २०२२-२३ ची प्रवेश शुल्क पावती.
३.संस्थेचे कॉलेज कन्फरमेशन लेटर.
४.वसतिगृह प्रमाणपत्र.

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी (खुर्द) ,ता. आंबेगाव, जि. पुणे.

प्रत- १. सर्व विभागप्रमुख यांनी सदर परीपत्रक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन द्यावी. यंत्र, अभियांत्रिकी , स्थापत्य, उपकरणीकरण, स्वयंचल, संगणक, उपयोजित विज्ञान.

२. सर्वसाधारण सुचना फलक.

३. श्री. अतुल चव्हाण यांनी सदर सुचना संस्थेच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करावी